# टोमॅटोवरील करपा, फळसड रोगाचे नियंत्रण

सी. बी. बाचकर,
डॉ. एस. एम. गांगुर्डे,
बी. टी. पाटील



लवकर येणारा करपा


खरीप हंगामात टोमॅटो पिकावर रोगाचे प्रमाण इतर हंगामांपेक्षा जास्त आढळून येते. सध्या लवकर येणारा करपा, फळसड या रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसत आहे.

## लवकर येणारा करपा (अर्ली ब्लाइट)

- **रोगकारक बुरशी :** अल्टरनेरिया सोलॅनी
- **लक्षणे :** सुरुवातीला जमिनीलगतच्या पानांवर लहान आकाराचे गोलाकार ते आकारहीन, तपकिरी ते काळपट रंगाचे ठिपके दिसून येतात. प्रादुर्भाव वाढत असताना वलयांकित ठिपके एकमेकांत मिसळतात. मोठ्या आकाराचे तपकिरी चट्टे पानावर तयार होतात. त्यामुळे पाने करपून गळतात. पानाप्रमाणे खोडावर देखील गर्द तपकिरी डाग पडतात. त्यामुळे फांद्या कमकुवत होऊन मोडतात. हिरव्या किंवा पिकलेल्या फळांवर तपकिरी ते काळ्या रंगाचे वलयांकित डाग आढळून येतात.

## फळसड

- फायटोप्थोरा निकाशियाना पॅरासीटिका आणि फायटोप्थोरा कॅपसिकी या बुरशीमुळे 'बक आय रॉट' नावाचा रोग होतो. हा विशेषतः खरिपात येणारा रोग असून, सततचा पाऊस, ढगाळ वातावरण, आर्द्रतायुक्त वातावरणामुळे जमिनीलगतच्या फांद्या, फळांवर अधिक प्रमाणात दिसतो. या बुरशीमुळे हिरव्या फळाच्या टोकाच्या बाजूस बदकाच्या डोळ्याच्या आकाराचे फिक्कट तपकिरी रंगाचे डाग एकमेकांत वलयाप्रमाणे मिसळलेले आढळतात. सुरुवातीला लहान आकाराचे असलेले हे डाग पूर्ण फळावर पसरून फळांतील गर रंगहीन होतो. रोगग्रस्त साल कातड्यासारखी होते आणि जुनी फळे सडतात. फळसड जमिनीतून किंवा बियाणांद्वारे होत असला तरी त्याचा प्रसार हवा व पाणी या मार्फत होतो.
- कोलेटोट्रीकम या रोगकारक बुरशीमुळे पिकलेल्या फळांवर लहान, पाणथळ, गोलाकार आणि खोलगट ठिपके पडून, तिथे काळपट बुरशीची वाढ झालेली दिसते. ढगाळ हवामानात रोगांचे प्रमाण वाढून प्रादुर्भाव झालेली फळे सडतात.
- फोमा बुरशीच्या प्रादुर्भावामुळे हिरव्या फळांवर सुरुवातीला तपकिरी डाग पडून नंतर काळे दिसतात. पिकलेल्या फळांवर खोलगट कातड्यामुळे डाग पडून फळे सडतात.
- फळे जमिनीला टेकल्यास तसेच सतत किंवा जोराचा पाऊस आणि आद्रतेचे प्रमाण जास्त, अशा हवामानात फ्युजॅरियम बुरशीचा प्रार्दुभाव पिकलेल्या फळांना होते. त्यामुळए फळांवर फिक्कट तपकिरी डाग पडतात. असे डाग पाणथळ होऊन तिथे पांढरी बुरशी वाढते. फळे सडतात.



फळसड रोग

## करपा आणि फळसड रोगांचे नियंत्रण

- पिकाची फेरपालट करावी. टोमॅटो या पिकानंतर बटाटा, मिरची, वांगी अथवा पुन्हा टोमॅटोचे पीक घेऊ नयेत.
- निरोगी बियाणे वापरावे.
- पेरणीपूर्वी बियाण्यास कार्बेन्डाझिम १ ग्रॅम प्रति किलो यांची बीजप्रक्रिया करावी.
- रोपवाटिकेत मॅन्कोझेब २ ग्रॅम प्रती लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी. त्यानंतर १० दिवसांच्या अंतराने दुसरी फवारणी करावी.
- लागवडीच्या वेळी जमिनीत ट्रायकोडर्मा पावडर २ किलो प्रति एकरी या प्रमाणात शेणखतात मिसळून द्यावी.
- झाडावरील व जमिनीवर पडलेली रोगग्रस्त फळे, पाने गोळा करून जमिनीत गाडावीत किंवा जाळून नष्ट करावीत. हे अवशेष बांधावर अथवा टोमॅटो प्लॉट शेजारी टाकू नयेत.
- रोगाची लक्षणे दिसताच, मॅन्कोझेब २५ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्झीक्लोराइड २५ ग्रॅम किंवा ॲझॉक्सिस्ट्रॉबिन १० मि.लि. प्रति १० लिटर पाणी यापैकी एका बुरशीनाशकाची फवारणी करावी. पुढे १० दिवसांच्या अंतराने आवश्यकतेनुसार ३-४ फवारण्या कराव्यात.

**सी. बी. बाचकर** ९८९०४६५६७०
(प्रा. बाचकर हे कनिष्ठ रोगशास्त्रज्ञ, डॉ. गांगुर्डे हे कनिष्ठ कीटकशास्त्रज्ञ आणि प्रा. पाटील हे वरीष्ठ भाजीपाला पैदासकार म्हणून अखिल भारतीय समन्वित संशोधन प्रकल्प - भाजीपाला पिके, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे कार्यरत आहेत.)